# <<नव संवत (२०१५) सुखमस्तु धनमस्तु >>

गोविंद संजीवनराव देशमुख संजीवनपेठकर

ही वसुंधरा, करी परिक्रमा, अविरत सूर्याला !
This Earth (Vasundhara = Earth) perpetually (avirat) nonstop orbits (parikrama = orbit) the Sun
द्वादश मास, अवधी लागे, एका भ्रमणाला !
It takes 12 months for one complete orbit (BhramaN =orbit) around the Sun
एका भ्रमणा, मध्ये वसती, एक वर्ष, ऋतू चार !
Twelve month period comprises of one year and four seasons (Rutu = seasons)
निसर्ग नियमे, निश्चित करती, वर्षांचे संचार, करती वर्षांचे संचार !! १ !!
Nature's laws dictate precise timing of earth rotations and the advent of the New Year (sanchar = perpetual wandering)

!! नव संवत सुखमस्तु धनमस्तु !! May the new year bring you happiness and wealth

ऋतू शरदाच्या, अंती होते, गत वर्ष समाप्ती !
End of Fall (Sharad = Fall) season signifies the end of the Passing year
हिम आगमाच्या, समेत होते, नव संवत प्राप्ती !
The New Year (Samvat = year) comes along with winter (him+aagaman = himaagam =winter) season
शुभ शकुनी, संदेश घेऊनी, वर्ष नवे येई !
The New Year comes with messages of good omen
सुप्त स्फूर्तीला, वर्ष आगामी, तेज पुन्हा देई, स्फूर्तीला तेज नवे देई !! २ !!
This coming year invigorates the hidden energies in us

!! नव संवत सुखमस्तु धनमस्तु !! May the new year bring you happiness and wealth

मध्य रात्रीला, करू आजचे, उद्यांत नामांतर !
At the stroke of midnight renaming of the year from past to future will take place
जुन्यास परसी, सोडुनी भेटू, नव्यास द्वारी म्होर !
Will leave the past (gat = past) year behind (parasee = back yard) us, and meet the New Year ahead of us (mhor = front)
गाऊ भैरवी, करू सांगता, अतीत काळाची !
We will give send off to the old (ateet = old) year by singing raga Bhairavi famed for the occasion of separations
भूप गाऊनी, देऊ शुभेच्छा, येत्या वर्षाची, सदिच्छा येत्या वर्षाची !! ३ !!
Let us express well wishes to all by welcoming the New Year by singing the Morning raga Bhoopali

!! नव संवत सुखमस्तु धनमस्तु !! May the new year bring you happiness and wealth